आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता
४ जून २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २१ जुलैपासून सुरु होणार

- गेल्या अकरा वर्षात देशातल्या ऊर्जा क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं असून सर्वांना स्वच्छ आणि परवडण्याजोगी ऊर्जा मिळावी यासाठी सरकार आग्रही असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- दहशतवादाविरुद्ध भारताचं धोरण स्पष्ट करण्यासाठी विविध देशांना भेट देण्यासाठी गेलेल्या ४ बहुपक्षीय शिष्टमंडळांचा दौरा पूर्ण

- बेंगळुरु मधल्या चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेल्या चेंगराचेंगरीत किमान सहा जणांचा मृत्यू

**आणि**

- देशाच्या ईशान्य भागात पावसाचा जोर, पूरस्थितीमुळे जनजीवन प्रभावित

**<><><><><>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २१ जुलैपासून सुरु होणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संसदीय कामकाज समितीची बैठक अध्यक्ष राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत झाली. त्यानंतर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी वार्ताहरांना ही माहिती दिली. हे अधिवेशन येत्या १२ ऑगस्टपर्यंत चालेल. त्यात सर्व विषयांवर चर्चा शक्य आहे असं ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची मागणी काही काळ विरोधी पक्षांकडून होत होती. मात्र आता नियमित पावसाळी अधिवेशनाच्या तारखा जाहीर झाल्या असल्यानं विशेष अधिवेशनाची शक्यता मावळली आहे.

**<><><><><>**

मागच्या अकरा वर्षात देशातल्या ऊर्जा क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं असून जनतेला स्वच्छ आणि परवडण्याजोगी ऊर्जा मिळावी यासाठी  सरकार आग्रही आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. सुधारणा, हरित ऊर्जा उपक्रम आणि स्वावलंबन यासाठी सरकारचा विशेष आग्रह असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं. यासाठी त्यांनी पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या एका लेखाचा दाखला दिला.

भारत जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था बनला आहे, तसंच एक धोरणात्मक शक्ति म्हणूनही उदयाला येत आहे, असं पुरी यांच्या या  लेखात म्हटलं आहे. ऊर्जा क्षेत्र  देशाच्या विकासासाठी महत्त्वाचं असून गेल्या दहा वर्षात केलेल्या कामाच्या पायावर या क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं आहे, असं पुरी म्हणाले. प्रधानमंत्र्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखील देशाचं ऊर्जा क्षेत्र आत्मनिर्भर झाल्याचंही पुरी यांनी या लेखात म्हटलं आहे.

<><><><>

दहशतवादाविरुद्ध भारताच्या शून्य सहिष्णुतेचं धोरण स्पष्ट करण्यासाठी जगभरातल्या विविध देशांना भेट देण्यासाठी गेलेल्या सात बहुपक्षीय शिष्टमंडळांपैकी ४ शिष्टमंडळं भारतात परतली आहेत. या दौऱ्यात शिष्टमंडळांनी विविध परदेशी नेते, वरिष्ठ अधिकारी, प्रभावशाली विचारवंत, माध्यमं आणि भारतीय समुदायांशी संवाद साधला. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ आज सकाळी यूएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देऊन भारतात परतलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ आज देशात परतणार आहे. या शिष्टमंडळाने कतार, दक्षिण आफ्रिका, इथिओपिया आणि इजिप्तला भेट दिली.

<><><><>

जागतिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होण्याची क्षमता विकसित करण्यासाठी वचनबद्ध असल्याची ग्वाही भारताने दिली आहे. प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव पी के मिश्रा यांनी जिनिवा इथं ‘आपत्ती जोखीम कमी करणे’ या विषयावरच्या आठव्या परिषदेत ही भूमिका मांडली. मिश्रा यांनी नॉर्वेच्या आंतरराष्ट्रीय विकास उपमंत्र्यांशी चर्चा केली आणि आपत्तीकाळातील जोखीमभार कमी करण्याच्या कामी आंतरराष्ट्रीय सहकार्याचं महत्व अधोरेखीत केलं अशी माहिती प्रधानमंत्री कार्यालयाने दिली आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रालाही मिश्रा उपस्थित राहिले. लवचिक आणि सुरक्षित भविष्यासाठी भागीदारी दृढ करणं असा भारताचा दृष्टीकोन असल्याचं त्यानी यावेळी स्पष्ट केलं.

<><><><><>

भारत-मध्य पूर्व राष्ट्र- युरोप आर्थिक कॉरिडॉर हा भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे आर्थिक व्यवहार सचिव दम्मू रवी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत एका परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. मैत्रीपूर्ण संबंध आणि जलद आर्थिक विकासामुळे भारत या महत्त्वाच्या कॉरिडॉरसाठी एक मोठा आधार ठरू शकतो, असं त्यांनी यावेळी म्हटलं. सप्टेंबर २०२३ मध्ये दिल्ली इथं झालेल्या जी-२० शिखर परिषदेदरम्यान याची घोषणा करण्यात आली. अरबी द्वीपकल्पात भारताला युरोपशी जोडण्याची ही एक योजना आहे.

<><><><><>

देशातली जनगणना १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार असल्याचं केंद्रीय गृहमंत्रालयानं सांगितलं आहे. ही जनगणना दोन टप्प्यात होईल. १ ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू काश्मीर, लडाख, उत्तराखंड, आणि हिमाचल प्रदेशमधे जातनिहाय जनगणनेला सुरुवात होईल. तर १ मार्च २०२७ पासून उर्वरित देशात जनगणना सुरू होईल. मागील जनगणना २०११ ला झाली होती.

त्यानंतर २०२१ ला जनगणना होणं अपेक्षित होतं. मात्र तब्बल पाच वर्ष उशीराने जनगणना होत आहे.

<><><><><>

बेंगळुरु मधल्या चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेल्या चेंगराचेंगरीत किमान सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा पहिला आयपीएल विजय साजरा करण्यासाठी जमलेल्या हजारो चाहत्यांनी विविध गेटमधून घाईघाईनं स्टेडियममध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तेव्हा चेंगराचेंगरी झाली. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. कर्नाटक सरकारनं सुरक्षेच्या कारणास्तव विधान सौधा ते चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियमपर्यंतची विजयी मिरवणूक यापूर्वीच रद्द केली होती. पोलीस काल रात्रीपासून उत्सव साजरा करणाऱ्या गर्दीवर नियंत्रण ठेवत आहेत.

<><><><><>

देशाच्या ईशान्य भागात पावसाचा जोर आहे. मणिपूरमध्ये इम्फाळ पूर्व जिल्ह्यातली ६४३ गावं पुरामुळं बाधित झाली असून, एक लाख ६४ हजार ८०० हून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. एकाचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. पुरात ३५ हजारहून अधिक घरांचं नुकसान झालं आहे. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दल, पोलिस, निमलष्करी दल, रेडक्रॉस, अग्निशमन दलांकडून पूरग्रस्त भागात बचावकार्य सुरू आहे. दरम्यान, मणिपूरमध्ये आज पावसाचा जोर कमी झाला असून  बहुतांश नद्यांचं पाणी उतरलं आहे. आसाममध्ये पूरस्थिती अद्यापही गंभीर असून २१ जिल्ह्यांमधल्या ६ लाख ३० हजारांहून अधिक जणांना पुराचा फटका बसला आहे. पुरामुळे घडलेल्या विविध घटनांमध्ये आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातल्या दीड हजारांहून जास्त गावांमध्ये पुराचं पाणी शिरलं असून १४ हजार ७०० हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. SDRF आणि NDRFची पथकं बचावकार्य करत आहेत. ब्रह्मपुत्रा,

बराक आणि इतर उपनद्या धोक्याच्या पातळीच्या वर वाहत आहेत. राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिलेल्या माहितीनुसार, २२३ मदत छावण्या उभारण्यात आल्या असून त्यात सध्या ४० हजारांहून जास्त जणांनी आश्रय घेतला आहे.

सिक्कीममधे खराब हवामानामुळे हवाई बचावकार्य थांबवण्यात आलं. ख़राब हवामानामुळे भारतीय हवाई दलाचे हेलीकॉप्टर आज बचावकार्यासाठी जाऊ शकलं नाही. लाचेन इथं अडकलेल्या ११० पर्यटकांना एअरलिफ्ट करण्यासाठी दोन हेलिकॉप्टर्स राखीव ठेवण्यात आल्याचं जिल्हा प्रशासनानं सांगितलं. दरम्यान झेमा आणि छतांग रस्त्यावरून पर्यटकांना बाहेर काढण्यासाठी विविध पर्यायांचा शोध घेतला जात आहे.

**<><><><><>**

वार्षिक हज यात्रेला आजपासून सुरुवात झाली. या य़ात्रेसाठी भारतासह जगभरातून १४ लाख यात्रेकरू मक्कामध्ये जमा झाले होते. जगातल्या सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्यांपैकी एक असलेल्या या यात्रेची औपचारिक सुरुवात म्हणून तारवियाह साजरा करण्यासाठी आज सकाळी यात्रेकरू मीना शहरामध्ये एकत्र आले. उद्या अराफाहचा दिवस असून दिवस आणि ईद अल-अधा उत्सव ६ जूनपासून सुरू होईल. सौदी अरेबियातील भारतीय राजदूतांनी या वर्षी सहभागी होणाऱ्या हजारो भारतीय यात्रेकरूंचे अभिनंदन करणारं निवेदन जारी केले. कॉन्सुलर टीम सौदी अधिकाऱ्यांसोबत जवळून काम करत असून सर्व मीना छावण्यांमध्ये प्रशासकीय आणि वैद्यकीय पथके स्थापन केली असल्याचं दूतावासानं म्हटलं आहे. भारतीय यात्रेकरू माहिती घेण्यासाठी आणि तक्रार नोंदवण्यासाठी हज सुविधा मोबाइल ॲपचा वापर करु शकतात. गेल्या वर्षी उष्णतेमुळे सुमारे तेराशे यात्रेकरुंचा मृत्यू झाला होता. त्यामुळे यावर्षी आरोग्य सेवा क्षमता ६० टक्क्यांनी वाढली आहे.

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्यावर महाभियोग चालवण्यासंदर्भात सरकार सर्व राजकीय पक्षांमध्ये एकवाक्यता निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. न्यायमूर्ती वर्मा यांच्या घरी मोठी रोकड सापडली होती. हे प्रकरण न्यायिक प्रक्रियेतल्या भ्रष्टाचाराशी संबधित आहे त्यामुळे त्याचं राजकारण होऊ नये, असं मत  संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बातमीदारांना बोलताना व्यक्त केलं.

**<><><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत स्पेनच्या कार्लोस अल्काराझ याने अमेरिकेच्या टॉमी पॉल याच्यावर ६-०, ६-१, ६-४ असा सरळ सेटमध्ये पराभव करत स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. येत्या शुक्रवारी होणाऱ्या उपांत्य सामन्यात त्याची गाठ इटलीच्या लोरेन्झो मुसेट्टीशी पडेल.

**//<><><><><>//**